# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. १ :—** मागील सभेचे दिनांक ९/७/२००९ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. जे.के. ढोके

अनुमोदकाचे नांव : श्री. आदिनाथ जाधव

परिवहन समिती ठराव क्र. :— ७ अ    दिनांकः— २०/१/२०१०

ही परिवहन समिती महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेले दिनांक ९/७/२००९ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ४ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

एकमताने

सभापती / पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. २ :–** शहरी व्यवस्थेसाठी बस थांब्याची जागा व वाहतुक पॅटर्न निश्चित करणे

.

## प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे शहर बस सेवा बीओओटी तत्वावर सुरु करावयाच्या निविदा डिसेंबर २००८ साली मागविण्यात आल्या व सदर निविदा दिनांक ५/१/२००९ रोजी उघडण्यात आल्या व मे. केस्ट्रल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. उल्हासनगर यांची सर्वात जास्त दर व महापालिकेस मिळणार रॉयल्टी रु. ०.५५ प्रति कि.मी. ची निविदा प्राप्त झाली व सदर निविदेस मा. परिवहन समितीने ठराव क्रमांक ६ दिनांक २७/२/२००९ अन्वये मंजुरी दिली.

मा. परिवहन समिती सभापती यांचे पत्र दिनांक १९/११/२००९ अन्वये मा. सभापती, परिवहन समिती यांनी उल्हासनगर शहरामध्ये नव्याने सुरु होणा–या शहरी व्यवस्थेसाठी बस थांब्याची जागा निश्चित करण्यासाठी व वाहतुक पॅटर्न निश्चित करणे या विषयावर चर्चा करणेबाबत मा. परिवहन समितीची बैठक आयोजित करण्यास विनंती केलेली आहे.

या अनुषंगाने मा. परिवहन समिती, सभापती यांनी कळविल्यानुसार उल्हासनगर शहरामये नव्याने सुरु होणा–या शहरी व्यवस्थेसाठी विविध ठिकाणी बस थांब्याची जागा निश्चित करण्यासाठी व उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहतुक पॅटर्न निश्चित करणे या विषयावर चर्चा करण्यासाठी गोषवारा मा. परिवहन समितीपुढे सादर करण्यांत येत आहे.

## परिवहन समिती ठराव क्रं. ७ ब — दिनांक २०/१/२०१०

सूचकाचे नाव श्री. जे.के. ढोके :

अनुमोदकाचे नाव : श्री. मोहन कंडारे

ही परिवहन समिती शहरी व्यवस्थेसाठी बस थांब्याची जागा व वाहतुक पॅटर्न निश्चित करण्याचा प्रस्ताव खालील कारणांमुळे वगळण्यास मान्यता देत आहे.

१) प्रशासनातर्फे देण्यात आलेल्या बस थांब्याच्या जागांची सूची नगररचना विभागाचे अभिप्रायासह फेरसादर करणे आवश्यक आहे.

२) जोपर्यंत बस थांब्याच्या जागाची सूची या समितीद्वारे निश्चित करण्यांत येत नाही तोपर्यंत बस सेवा सुरु करता कामा नये. तसेच बस सेवा सुरु करण्याचा मुहुर्त या समितीच्या ठरावाशिवाय निश्चित करु नये.

३) ठेकेदारांच्या निविदेचा वैधता कालावधी दिनांक २८ जानेवारी, २०१० रोजी संपृष्टात येण्यापूर्वी वरील दोन कारणांमुळे जर बस सुरु करता येत नसेल तर वाढीव कालावधी प्रयोजनार्थ निविदेची वैधता कायम समजण्यांत येईल.

सूचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी<br>परिवहन समिती सभा<br>उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. १ :–** मागील सभेचे दिनांक २०/१/२०१० रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव :

अनुमोदकाचे नांव :

परिवहन समिती ठराव क्र. :– दिनांकः– ५/२/२०१०

ही परिवहन समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक २०/१/२०१० रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ६ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

एकमताने

सभापती / पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. २ :—** सन २००९—१० चे सुधारीत व २०१०—२०११ चे मूळ अंदाजपत्रक तयार करणे.

.

## प्रस्तावना

मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम ९८ च्या तरतुदीप्रमाणे परिवहन व्यवस्थापकाचे अंदाज विचारात घेवून ''ब'' अर्थसंकल्पीय अंदाज परिवहन समितीने तयार करावयाचे आहेत. सदर अंदाजात परिवहन उपक्रमाचे संपदान, त्याचा विस्तार, त्याचे प्रशासन, चालविणे व त्याची व्यवस्था यामुळे महानगरपालिका ज्याबद्दल या अधिनियमान्वये दायी असेल अशा सर्व रक्कमा आणि मुद्दल व व्याज यांचे हप्ते, जसजसे देय होतील तसतसे ते भरण्याबाबत तरतूद केली पाहिजे.

महानगरपालिकेने परिवहन उपक्रम खाजगी सहभागाने राबविण्याचे योजले असून अधिनियमातील तरतूदीनुसार वित्तीय वर्ष २००९—२०१० चे उत्पन्न व खर्चाचे सुधारीत अंदाज पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

(आकडे हजारात)

| | |
|---|---|
| ''ब'' अंदाजपत्रकीय उत्पन्न | : ३३ |
| ''ब'' अंदाजपत्रकीय खर्च | : २८७ |
| परिवहन सेवा खर्च | : १०० |
| सभासदांना मानधन, सभा व इतर भत्ते | : १८७ |
| | २८७ |

आर्थिक वर्ष २०१०—२०११ साठी तयार करण्यात आलेला उत्पन्न व खर्चाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

(आकडे हजारात)

| | |
|---|---|
| ''ब'' अंदाजपत्रकीय उत्पन्न | : २०० |
| ''ब'' अंदाजपत्रकीय खर्च | : २३९० |
| परिवहन सेवा खर्च | : १५०० |
| सभासदांना मानधन, सभा व इतर भत्ते | : ८९० |
| | २३९० |

वर्ष २०१०—२०११ करिता उत्पन्न व खर्चाचे अंदाज लक्षात घेता, राहणारी तुट ''अ'' अंदाजपत्रकातून वर्ग करण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ मधील कलम ९८ च्या तरतुदप्रमाणे उत्पन्न व खर्चाचे परिवहन उपक्रमासमोर सादर करण्यात येत आहे.

## परिवहन समिती ठराव क्रं.          दिनांक ५/२/२०१०

सूचकाचे नाव :

अनुमोदकाचे नाव :

ही परिवहन समिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ९८ मधील सर्व तरतूदीस अधिन राहून वर्ष २००९—२०१० चे सुधारीत व वर्ष २०१०—२०११ चे मुळ अंदाजपत्रक परिवहन व्यवस्थापकाचे अंदाज विचारात घेवून परिवहन उपक्रमाचे पुढील प्रमाणे अंदाजपत्रक मंजुर करीत आहे.

<u>वर्ष २००९–२०१० चे सुधारीत अंदाजपत्रक :</u>

''ब'' अंदाजपत्रकीय उत्पन्न : ३३
''ब'' अंदाजपत्रकीय खर्च : २८७

<u>वर्ष २०१०–२०११ चे मुळे अंदाजपत्रक :</u>

''ब'' अंदाजपत्रकीय उत्पन्न : २००
''ब'' अंदाजपत्रकीय खर्च : २३९०

उत्पन्न व खर्चाचे अंदाज लक्षात घेता, राहणारी तूट ''अ'' अंदाजपत्रकातून वर्ग करण्यास मंजुरी देत आहे. या ठरावातंर्गतचा निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सूचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>निकाल घोषणा</u>

महापालिका सचिवांनी दिनांक ९/४/२०१० रोजी काढलेल्या सूचने अन्वये **परिवहन समितीच्या** सर्व सदस्यांना **परिवहन समिती** सभापती पदाचा निवडणूक कार्यक्रम कळविण्यांत आला होता. त्या अनुषंगाने दिनांक १३/४/२०१० रोजी ३ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी दोन उमेदवारांनी दिनांक १७/४/२०१० रोजी विहित मुदतीत आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले. त्यामुळे एकमेव उमेदवार ***श्री. चोडणकर मिलिंद जगन्नाथ*** हे रिंगणात शिल्लक राहिल्या आहेत.

**परिवहन समिती** सभापती पदासाठी एकमात्र उमेदवार राहिले असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे

सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम–२००७ च्या नियम–६ मधील पोटनियम–१ अन्वये पीठासीन अधिकारी म्हणून मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये **परिहवन समिती** सभापती पदाचे उमेदवार ***श्री. चोंडणकर मिलिंद जगन्नाथ*** हे **बिनविरोध** निवडून आल्याचे जाहिर करतो.

दिनांक :–१७/४/२०१०

स्थान :– उल्हासनगर महानगरपालिका
सभागृह

(सुभाष सोनवणे)
जिल्हाधिकारी
तथा
पीठासीन अधिकारी